# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१६/०७/२०१६.

**१) गळयाला दोर आवळुन जिवानीशी ठार केले. :—**

दिनांक १४/०७/२०१६ रोजी १३.०० ते दि. १५/०७/२०१६ रोजी ०९.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने विनोद अशोक धुर्वे वय २४ वर्ष रा. गांधी वार्ड देवाडी याचे दोन्ही हात दुपटयाने बांधुन गळयाला दोर आवळुन जिवानीशी ठार केले व विहीरीत दोरीने लटकवुन ठेवले असे फिर्यादी वय ३० वर्ष यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंदद करण्यात आला पुढील तपास पोउपनि. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १५/०७/०१६ रोजी १४.०० वा. दरम्यान फिर्यादी अमोल रमेश उरकुडे वय ३० वर्ष, रा. सुभाष वार्ड वरठी हे त्यांची टिव्हीएस ज्युपीटर पांढ—या रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु ६६७१ कि. ३५०००/—रू. ची भुताला तलावाच्या बाजुला झाडाच्या खाली ठेवुन मासोळी पकडण्यासाठी गेले होते. ती मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. असे फिर्यादिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. खोडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) संगनमत करून विश्वासघात केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३०/११/२०१५ चे आज पावेतो तिन्ही संयुक्त धान्य व्यापारी आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी विठ्ठल किसन अहिर वय ६७ वर्ष, रा. सिल्ली यांच्या मालकीचे शेती उपज जयश्रीराम जातीचे धान २,७९,२८८/—रु. व इतर एकुण १७० शेतकरी यांचे १,१२,६१,१६३/—रु. चे धान खरेदी करुन फिर्यादीचे १,७९,२८८/—रु. व ईतर शेतक—यांचे धान खरेदीचे रुपये परत न करता त्यांचे एकुण १,१४,४०,४५१/—रु. चे विश्वासघात केला. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४०६,३४ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रहांगडाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक १५/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, गोबरवाही, पवनी, अडयाळ, करडी व दिघोरी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारू कि. २२६०/—रू. व ४२० मिली. देशी दारू कि. ७८१७/—रू. असा तसेच जुगारातुन १,१५,३३० असा एकुण कि. १,२३,१४७/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.